
# गीतकाव्य आणि संगीत

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - गीतकाव्य, संपा. वसंत दावतर, आलोचना प्रकाशन, मुंबई, १९७१)

संगीत आणि साहित्य यांचा संबंध अनेक ठिकाणी येतो. नाट्य, चित्रपट, इ. कलांमध्ये जसा हा संबंध येतो, त्याचप्रमाणे गीतासारख्या प्रकारांतही तो आलेला दिसतो. परिणामतः संगीताची भूमिका अशा ठिकाणी नेमकी काय असते, हा प्रश्न नेहमीच चर्चेस घ्यावा लागतो. विविध आविष्कारप्रकारांनुसार या बाबतीत चर्चेचा निष्कर्ष अर्थातच वेगवेगळा येईल. ही गोष्ट साहजिक आहे. कारण संगीत जरी सगळीकडे असले, तरी त्याचा संदर्भ काही तोच राहात नाही. तेव्हा प्रत्येक प्रकारच्या चर्चेत संकल्पनात्मक लवचिकपणा ठेवून विचार पुढे चालविणे जरूर आहे. एवढे नमूद करून गीतकाव्य आणि संगीत यांचे संबंध तपासून पाहू.

प्रथमतः असे लक्षात घेतले पाहिजे की, या संबंधाच्या मुळाशी प्रश्न आहे तो शब्द आणि स्वर यांच्या नात्याचा. शब्द आणि त्यांचे नाते विशिष्ट प्रकारचे असले की, गीत निर्माण होते आणि ते दुसऱ्या एका विशिष्ट प्रकारचे असले, तर गीतकाव्य शक्य होते. कोणत्या परिस्थितीत यांपैकी कोणाचा उद्भव व का शक्य होतो, हे आपल्याला समजून घेतले पाहिजे. शब्द-स्वर संबंधाविषयींच्या मूल प्रश्नाची सोयीस्कर मांडणी पुढील आकृतीच्या साहाय्याने करता येईल.




या आकृतीच्या निरीक्षणावरून काही निष्कर्ष हाती लागतात.

१) सांगीतिकतेकडून काव्यात्मकतेकडे जाऊ लागले की, सांगीतिकतेचे क्षेत्र संकोच पावत जाते व त्याच प्रमाणांत काव्यात्मकतेचे क्षेत्र विस्तारत जाते.

२) उलटपक्षी काव्यात्मकतेकडून सांगीतिकतेकडे गति असली की, काव्यात्मकताक्षेत्र निमुळते होत जाते व सांगीतिकतेचे अधिकारक्षेत्र विस्तारते.

३) कोणत्याही एका बाजूचे टोक गाठले, तरी दुसऱ्या बाजूचा संबंध अजिबात तुटला, असे होत नाही. संबंध फक्त कमीतकमी राहतो. पर्यायाने सांगीतिकतेच्या निकषास उतरणारी रचना काव्यात्मतेचा स्पर्शही झालेली नसते वा काव्यात्मतेच्या अधिकारक्षेत्रात जमा होणारी रचना सांगीतिकतेस अगदी झिडकारून टाकते, असे होत नाही.

४) पण तरीही सांगीतिकतेच्या ध्रुवाकडची एखादी रचना कमी काव्यात्म आहे, असे म्हणणे किंवा काव्यात्मतेच्या तळावर मुक्काम ठोकणारी रचना कमी सांगीतिक आहे, असे म्हणणे, बरोबर नाही. कारण कोणत्यातरी एका तळावरची रचना आणि त्या तळाशी दुसऱ्या तळावरून निमुळत्या पाचरीच्या आधारे तात्त्विक नाते जोडणारी रचना यात जातीचा फरक असतो. गुणधर्मात पडणारा हा फरक इतका मोठा असतो की, अशा प्रसंगी कमी जास्त अशी मोजमापी फरकाची विशेषणे वापरून का होईना, पण काव्यात्म वा सांगीतिक ह्याच संज्ञा वापरीत राहणे योग्य नाही. हे संज्ञादारिद्र्यच नव्हे, तर सांकल्पनिक गोंधळाचे निदर्शक होईल. मुद्दा असा की, एखादे काव्य गीतकाव्य असले म्हणजे त्यात थोडी सांगीतिकता व थोडी काव्यात्मता असते, असे म्हणणे फार ढोबळ होईल. उलट्या बाजूचे विधानही त्यातच जमा होते. या पार्श्वभूमीवर गीतकाव्य म्हणजे काय, या प्रश्नास उत्तर देतांना पहिले लक्षात घेण्याजोगे सत्य म्हणजे गीतकाव्याचा सांगीतिक एकांगीपणा हे होय. गीतकाव्यात सांगीतिक पूर्णरूपात आढळणारी स्वर-लय-बंदिश ही तिन्ही पदें येत नाहीत. त्यांत स्वर नसून नाद असतो, लय नसून कालगत नियमितता असते आणि सांगीतिक आविष्कार नसल्याने बंदिश आढळली, तर ती अर्थाच्या पातळीवरची असते. सांगीतिक रचनाकल्पात सांगीतिक आविष्काराच्या शक्यता असीम नसल्या, तरी असंख्य असतात. उलटपक्षी गीतकाव्यातला सांगीतिक भासणारा आविष्कार नादाच्या चढउतारापुरता, अक्षरे अर्थानुसार कमीअधिक वेगाने म्हणण्याइतका, आणि महत्त्वाच्या शब्दांची वा शब्दसंहितीच्या घनता पुनरावृत्तीने वाढविण्यापुरता मर्यादित असतो. ही सर्व साधने सांगीतिक आविष्कारात आहेत. पण एवढ्यानेच संगीत होत नाही. या सर्व साधनांचे रक्ताचे नाते आहे ते बोलभाषेशी. त्यातल्या नादसृष्टीशी. संगीताच्या स्वरभाषेशी या नादसृष्टीचा कल्पनासाम्याचा (analogical) संबंध असतो. संगीतातील अंगभूत गुणांचे जरासे सैल वर्णन करूनच सांगीतिक आविष्काराशी असलेल्या गीतकाव्याच्या स्वरूपसाम्याचे वर्णन सांगीतिकता म्हणून करता येईल. गीतकाव्यांतील सांगीतिकता ही स्वरूपतः नादनिष्ठ, कालविभाजननिष्ठ आणि अर्थनिष्ठ रूपकल्पनेशी निगडित आहे. यामुळे अर्थात् त्याच्या गुणवत्तेत काही कमीपणा येत नाही. पण त्याची कोटि मात्र सांगीतिकतेच्या अधिकारक्षेत्रात बसू शकत नाही.

गीताबाबतीत थोडासा वेगळा प्रकार असतो. गीतात सांगीतिक आविष्काराच्या विस्ताराच्या शक्यता अधिक असतात आणि पर्यायाने स्वराविष्कार करण्यास योग्य अशी शब्दयोजना, तालाच्या वर्तुळात मोडतोड न करता बसेल अशी कालप्रवाहातील शब्दांची वाटणी, आणि सांगीतिक रूप सिद्ध होऊ शकेल अशा तऱ्हेच्या विशिष्ट भावनासमुच्चयाचे अस्तित्व, ह्या गोष्टी गीतात हमखास आढळतात. या तिन्ही बाबींचे उदाहरण घेऊन स्पष्टीकरण करू. स्वराविष्कारास योग्य ती शब्दयोजना म्हणजे काय? साधे उदाहरण म्हणजे स्वरांवर मुक्काम करता यावा, त्यावर थांबून वा तिथेच त्याला सोडून साहाय्यक स्वरपुंजांची गुंफण करता यावी, असे शब्द गीतात असणे. आ, ई, इत्यादी दीर्घ स्वर हे सांगीतिक स्वरांचे ओझे पेलू शकतात. व्यंजनांचे तसे होत नाही. व्यंजने वा अ, इ, उ, हे ऱ्हस्व स्वर वाढलेच, तर शब्दांची नादाकृति बिघडते. अशा तऱ्हेने विकृत झालेली शब्दाकृति अर्थनिष्पत्ति करण्यास असमर्थ ठरते किंवा अर्थनिष्पत्ति कष्टसाध्य होते. तालवर्तुळात बसेल अशी शब्दयोजना हवी, याचाही अर्थ याच संदर्भात उलगडतो. शब्दयोजना अशी पाहिजे की, त्यांतील शब्दांचे पौर्वापर्य, त्यांच्या उच्चरणाची मंद-जलद गति किंवा त्यावर देण्यात येणारा कमी-अधिक जोर, यांचे स्वरूप अर्थाविष्काराच्या गरजेनुसार ठरता कामा नये. वर उल्लेखिलेल्या गोष्टी जेव्हा कालौघाचे विभाजन करून एक आधारवर्तुळ स्थापन करणाऱ्या तालानुसार नियंत्रित होऊ लागतात, तेव्हा तालापुरता सांगीतिकतेचा प्रवेश होतो, असे म्हणता येईल. शब्दांची काव्यगत वाटणी अशी असली की, तालवर्तुळाबरोबर काव्य फिरू लागते. या तालानुसारी शब्दपेरणीच्या अभावी शाब्दिक व सांगीतिक वाक्यांची मोडतोड होते. उच्चारण आणि ग्रहण, किंवा आविष्कार आणि प्रतीति, इत्यादी सर्वच अवस्थांत यामुळे एक अनावश्यक जटिलता निर्माण होते.

सांगीतिक रूप सिद्ध करण्यास मदतगार होणाऱ्या भावनासमुच्चयाने युक्त अशी शब्दयोजना म्हणजे काय, हा तिसरा प्रश्न. याचा अर्थ असा की, स्वरयोजनेचे सूचन होईल अशी शब्दरचना हवी. असे होणे हे गीताचे एक प्रमुख लक्षण होय. यामागील

प्रक्रिया बघण्यासारखी आहे. प्रत्येक शब्द हा विशिष्ट भाषेचा आणि प्रत्येक भाषा ही विशिष्ट सांस्कृतिक संचयाचा घटक असते. अनेक गुंतागुंतीचे मानसिक व्यापार व त्यांतून हाती येणारे निष्कर्ष, यामुळे एक संकेतावली समाजाच्या हाती लागत असते. या संकेतावलीमुळेच विशिष्ट प्रसंग व विशिष्ट व्यापार (उदा. मरण आणि शोकप्रदर्शन, जन्म आणि आनंदोत्सव) यांची भाषेशी सांगड घातली जाते. या निश्चित झालेल्या संबंधाचा निदर्शक असा भाषेचा उपयोग अर्थात रूढ होत जातो. याच प्रक्रियेनुसार विशिष्ट प्रसंग व विशिष्ट स्वरयोजना वा विशिष्ट लयाविष्कार यांचीही सांगड घातली जाते. पुढे कल्पनासाम्याच्या आधारे विशिष्ट प्रसंगाशी निगडित असणारे शब्द व स्वरसमूह हे त्यासारख्या इतर प्रसंगांशींही निगडित होत जातात. आणि याचीच शेवटची पायरी म्हणजे विशिष्ट स्वरसमूह आणि शब्दसमूह यांचेही नाते निश्चित म्हणून वावरू लागते. मानववंशशास्त्रातले एक सत्य म्हणून ज्याची गणना करावी, असा हा एक संकेत होतो. आणि मग त्या सांस्कृतिक संचयाचा वारसदार असलेल्या प्रत्येक संगीतकाराच्या संगीतयोजनेचे नियंत्रण करणाऱ्या गोष्टीत याची गणना करावी लागते. याचा अर्थ असा नव्हे की, सर्व गीतांच्या चाली पूर्वीच ठरलेल्या असतात, किंवा प्रत्येक गीतास एकच चाल असते. अर्थ असा की, स्थूलतः कोणत्या गीतास कोणत्या तऱ्हेची चाल असावी, याची मार्गदर्शक तत्त्वे वा सुरावटी प्रत्येक समाजाच्या सांगीतिक पार्श्वभूमीवर वावरत असतात. व्यक्तीव्यक्तीनुसार त्याच गीताच्या चाली बदलू शकतात वा एकाच गीतास वेगवेगळया चाली दिल्या, असेही होऊ शकते. पण याचा अर्थ इतकाच की, गीतही निराळया तऱ्हेने अनुभविले जात असते. आणि तरीही वर उल्लेखिलेल्या सांगीतिक पार्श्वभूमीचा संबंध काही तोडता येत नाही.

जनमानस आणि त्याच्या तळाशी संस्काररूप होऊन बसलेले संकेत यांचा गीताशी असलेला संबंध पाहिला की, आणखीही एक मुद्दा सुचतो. तो असा की, गीत हे आशयदृष्ट्या स्थूलाकडे झुकणे अनिवार्यच आहे. गीतकाव्यावर गीताइतके सांगीतिक आविष्कारपात्र असण्याचे बंधन नसते आणि म्हणून ते अर्थदृष्ट्या अधिक सूक्ष्म, घन व अधिक व्यक्तिगतही असू शकते. उलटपक्षी गीताला सांगीतिक आविष्कारास डोळयांपुढे ठेवूनच अर्थव्यक्ति साधावी लागते. अधिक विस्तृत जनसमुदायास त्याची प्रत्यक्ष हांक पोचते. पण अर्थव्यक्ति अधिक स्थूल पातळीवर राहाते. अर्थाच्या पातळीवर जे गमावले जाते, त्याची भरपाई गीतात स्वरपातळीवर होते. गीताचे कार्य वेगळे आणि म्हणून त्याची साधनेही वेगळी असतात. या पार्श्वभूमीवर पाहाता बटबटीत, ढोबळ गीते फार लिहिली जातात, ही तक्रार अगदी अनाठायी नसली, तरी जरा भडक वाटते. कारण अर्थाची स्थूलता गीताच्या संकल्पनेतच अनुस्यूत आहे. उलटपक्षी, गीतकाव्यात गेयता कमी, असे आक्रंदन करणेही योग्य नव्हे. कारण गीतकाव्याचा जन्म सांगीतिक गरजांची भूक भागविण्यासाठी झालेला नाही.

मला वाटते, मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांनी गीतकाव्य, गीत, आणि पद असे तीन प्रकार वेगळे मानावेत. गीतकाव्य, आणि गीत यांतला फरक स्पष्ट झालेलाच आहे. पद हे उघड उघड शास्त्रीय संगीताकडे झुकलेले असते. ते वैयक्तिक संगीताविष्कारास वाव देते आणि अर्थदृष्ट्या पाहाता एखाद्या घटनेच्या प्रवाहांतले बेट बनून राहाते. श्रोते पदाचा अर्थ समजून घेतात, पण त्याचा आणि चालीचा संवादभाव आहे की नाही, इत्यादी गोष्टींकडे लक्ष देत नाहीत. 'पद' ह्या संज्ञेस मराठी वाङ्मयपरंपरेत एक विशिष्ट अर्थ आहे, ही गोष्ट मला मान्य आहे. परंतु 'पद' ही संकल्पना रूढ होण्याइतका त्याच्या अर्थास अजून कडवेपणा प्राप्त झालेला नाही, असे वाटते. आणि तसे पाहिले, तर संज्ञेविषयी आग्रह नाही. पण त्यामागील संकल्पनेचा फरक आणि उद्देशाचा फरक ध्यानी घेऊन विचार व्हावा, इतकेच सुचवायचे आहे. संतकवींच्या रचना ज्या तऱ्हेने कीर्तनात गायल्या जातात त्या किंवा आपल्या बहुसंख्य नाट्यसंगीतांतील रचना ही सर्व पदे होत. अर्थाद्वारे विशिष्ट घटना व कथानकाचा भाग याच्याशी पद नाते जोडते. पण एकदा अर्थ पोचविला की मग अर्थाची बंधने सांगीतिक आविष्कारावर पडू द्यायची नाहीत, असे पदाचे ब्रीद असते. नाट्यसंगीताबद्दलच्या चुकीच्या कल्पनेमुळे आपण बराच काळ नाट्यपदांना नाट्यसंगीत समजत आलो आहोत. पदाचा विशिष्ट घटनेशी वा कथाभागाशी जन्मजात सबंध असतो. पण पुढे मात्र ते संगीतकुळांत दत्तक जाते, असे म्हणण्यास हरकत नाही.

विवेचनाचा निष्कर्ष मांडावयाचा तर थोडक्यात असे म्हणता येईल की, जिला गीतकाव्यातील प्रचलित अर्थाने गेयता म्हणतात ती बोलभाषेतली नादमयता, आवाजाच्या उच्चारवलयाचे आणि अर्थाविष्कारार्थ आवश्यक असणारे शब्दाघात, शब्दांची पुनरावृत्ति वा त्यांची विशिष्ट रचना, या वैशिष्ट्यांची एक आवृत्ति असते. अगदी गद्यापेक्षा सांगीतिकतेच्या गीतकाव्य जवळ जाते. पण तरीही सांगीतिक आविष्कारात प्रत्यक्षतः कार्यकारी असणाऱ्या घटकांची तेथे उपस्थिती नसते. त्यांचे कार्य गीतात आणि त्याहीपेक्षा पदात अगदी सांगीतिकतेच्या जातकुळीतल्या संगीतप्रकारांसारखेच असते. गीतकाव्य, गीत, पद, यात आढळणाऱ्या वैशिष्ट्यांमुळेच त्यांना स्व-रूप प्राप्त होते. यात श्रेष्ठ-कनिष्ठतेचा संबंध नाही.

---